दै. पुण्यनगर दि. ०५-०८-२४

# 3 चोरट्यांकडून ५८ हजारांचा मुद्देमाल जप्त

## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

**नांदेड/प्रतिनिधी**

शहरातील हिंगोली गेटकडे जाणाऱ्या रस्त्यावर दुचाकी चोरी व जबरी चोरी करणाऱ्या तिघांना स्थागुशाच्या पथकाने जेरबंद केले असून त्यांच्याकडून ५८ हजार रूपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी वेगवेगळी पथके तयार करुन माली गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेण्याची कारवाई सुरू केली होती. दि. २ ऑगस्ट २०२४ रोजी हिंगोली गेटकडे जाणाऱ्या रस्त्यावर दिलीप कांबळे, (२५, रा. अजनी ता. बिलोली जि. नांदेड), अविनाश भरांडे, (२९, रा. अजनी ता. बिलोली जि. नांदेड) तसेच एका विधीसंघर्षीत बालकाकडुन वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या



२३२/२४ कलम ३७९ भा. दं. वि. गुन्ह्यातील २० हजार रुपये किंमतीची दुचाकी जप्त करण्यात आली. तसेच रामतीर्थ पोलीस ठाण्याच्या हद्दीत २५/२४ कलम २९२, ३४ भादंवि गुन्ह्यातील १२ हजार रुपयांची रोकड, देगलूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत २२२/२४ कलम ३९२,३४ भादंवि गुन्ह्यातील २६ हजार रुपयांची रोकड असा एकुण ५८ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे पोलीस निरीक्षक **(पान २ वर..)**